# पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-44.

Pimpri-Chinchwad New Town Development Authority
PCNTDA
ESTD. 1972
PUNE
Nigdi

## वाहने विक्रीच्या अटी व शर्ती :-

1. सदरील वाहनांसाठी खालीलप्रमाणे बयाणा रक्कम रोख चलनाने अथवा डिमांड ड्राफ्टने भरुन दरपत्रका सोबत जोडावे. प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्र बयाणा रक्कम भरणे आवश्यक आहे.
   बयाणा रक्कम व इतर तपशिल.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | खरेदी वर्ष | विक्रीची अपसेट प्राईज | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | फियाट सियाना कार - 1 नग | 2001 | 25,000/- | 2000/- |
| 2. | ॲम्बेसिडर कार-1 नग | 2004 | 70,000/- | 3000/- |
| 3. | ट्रॅक्टर ट्रेलर -1 नग | 1997 | 27,000/- | 2000/- |
| | **एकूण** | | 1,22,000/- | 7000/- |

2. दरपत्रक धारकाने बयाणा रकमेचा भरणा केला नसेल तर त्यांची निविदा उघडली जाणार नाही. तसेच निविदा रद्द केली जाईल.
3. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-44 यांनी राखून ठेवलेले आहेत.
4. अपेक्षित किंमत प्राप्त न झाल्यास सदर दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्यांत येईल. या बाबतचा निर्णय सर्वस्वी प्राधिकरण कार्यालयाचा राहिल. विक्रीची अपसेट प्राईज ही कमीत कमी किंमत असून त्याच रक्कमेने बोली/देकार रक्कम स्विकारली जाणे प्राधिकरण कार्यालयावर बंधनकारक नाही.
5. प्राधिकरण कार्यालयात अपेक्षित किंमत नमुद केलेले दरपत्रक स्विकारण्यात येईल. जास्त रकमेच्या दरपत्रक धारकास वाहनाची विक्री केल्याबाबतचे पत्र दिले जाईल. दरपत्रक धारकाच्या स्विकृत दरपत्राकाच्या रकमेपैकी 25% रक्कम व त्यावरील व्हॅट रक्कम तात्काळ प्राधिकरणाच्या इंडियन ओव्हरसीज बँक, निगडी, पुणे येथे असलेल्या खात्यामध्ये चलनाने जमा करावी व ऊर्वरित 75% रक्कम व त्यावरील व्हॅट रक्कम पुढील 7 दिवसांच्या आत चलनाने जमा करावी. या कालावधीमध्ये रक्कम जमा न केल्यास प्रतिदिन रु.500/- दराने एकूण रक्कमेवर दंड भरावा लागेल. दंडात्मक कार्यवाही 7 दिवसांपर्यंत होईल. त्यानंतर दरपत्रक प्रक्रिया रद्द करुन बयाणा रक्कम व प्राप्त 25% रक्कम जप्त करण्यांत येईल.
6. वाहनांची पूर्ण रक्कम / कर वगैरे इ. भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वाहनाचा ताबा देण्यात येईल.
7. वाहनात असणारी दोषांची शक्यता , मोडतोड, नादुरुस्ती याबाबत दरपत्रक धारकाने वाहनाची तपासणी केली आहे असे समजण्यात येईल, नंतर कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.
8. शासकीय कर याबाबत सूट मिळणेकामी या कार्यालयाकडून प्रमाणपत्र मिळणार नाही. शासनाचे सर्व लागू असणारे कर (आर.टी.ओ.टॅक्स/ विमा पॉलिसी / प्रवेश / कर /जकात/ व्हॅट) भरण्याची जबाबदारी दरपत्रक धारकावर राहील.